# जिल्हा परिषद उस्मानाबाद

## कृषी विभाग

## नवीन राष्ट्रीय बायोगॅस व सेंद्रीय खत व्यवस्थापन कार्यक्रम सन २०१९-२०

# यशोगाथा

कृषी विभाग
पंचायत समिती परंडा

## योजनेचा उद्देश :-

1. अपारंपारिक उर्जा साधनांच्या वापरास प्रोत्साहन देणे व त्यांचा वापर वाढवणे.
2. पर्यावरण संतुलित इंधनाची निर्मीतीस प्रोत्साहन देणे व त्यांचा कार्यक्षम वापर वाढवणे.
3. बायोगॅस पासून तयार होणाऱ्या सेंद्रीय खताचा वापर वाढववून, रासायनिक खतांना सक्षम पर्याय निर्माण कारणे.
4. स्वयंपाकासाठी व इतर घरगुती उपयोगासाठी बायोगॅस चा वापर वाढवून इतर पारंपारिक उर्जा साधनांचा वापर कमी कारणे.
5. इंधनासाठी होणारी वृक्षतोड थांबवणे व वनांचे संवर्धन करणे.
6. ग्रामीण भागातील स्त्रियांचे धुरापासून संरक्षण करणे.
7. बायोगॅस संयत्रास शौचालय जोडणी करून गाव व परिसर स्वच्छ कारणे.

## लाभार्थीची माहिती :-

नाव :- श्री. नवनाथ सोपान कुदळे गाव - मलकापूर तालुका :- परंडा

गट नं. :- 220 क्षेत्र :- 0.94 (हे.आर.)

कुटुंबातील सदस्य संख्या :- 06 जनावरांची संख्या :- 08

## बायोगॅस सयंत्र माहिती :-

सयंत्राचा प्रकार :- दीनबंधू आकार :- 03 घ.मि.

सयंत्र आस्थापना दिनांक :-23.10.2019 सयंत्र कार्यान्वित दिनांक :- 07.02.2020

## प्राप्त अनुदान :-

राष्ट्रीय योजना अनुदान :- 12000/- शौचालय जोडणी अनुदान :- -

जिल्हा परिषद उपकारा प्रोत्साहनपर अनुदान :- 5000/- एकून प्राप्त अनुदान :- 17000/-




श्री नवनाथ सोपान कुदळे रा मलकापूर ता परंडा यांचे बायोगॅस संयंत्रा चे बांधकाम पुर्ण

## पार्श्वभूमी :-

राष्ट्रीय बायोगॅस योजनेचा लाभ घेण्यापूर्वी माझ्या घरचा स्वयंपाक हा चुलीवर होत असे. चुलीवर स्वयंपाक करण्यासाठी आम्ही पारंपारिक पद्धतीने रानातील वृक्ष तोडुन त्याचा वापर सरपणासाठी करीत होतो. त्यासाठी शेतामध्ये पायपीट करावी लागत असे. तसेच शेणापासून तयार केलेल्या गोवऱ्या व इतर जळाऊ वस्तुंचा वापर करून दैनंदिन लागणाऱ्या इंधनाची गरज भागवीत असे. प्रतेक आठवड्याला जळणासाठी सरपण म्हणून 40 ते 50 किलो लाकूड जाळले जायचे. म्हणजे साधारणत: दोन ते तीन महिन्यात एक झाड आम्ही सरपणासाठी वापरात होतो. या वृक्षतोडीमुळे पर्यावरणाची मोठ्या प्रमाणात हाणी होत होती. चुलीवर स्वयंपाक करताना निर्माण होणाऱ्या धुरामुळे स्वशनाचे विकार, डोके दुखणे, डोळे जळजळ करणे ई. चा त्रास होत असे.




श्री नवनाथ सोपान कुदळे रा मलकापूर ता परंडा यांचे बायोगॅस संयंत्र कार्यान्वित

## बायोगॅस सयंत्र दुहेरी फायदा :-

बायोगॅस सयंत्राचे बांधकाम पुर्ण झाल्या नंतर एक महिन्यानंतर त्यामध्ये शेण भरण्यास सुरुवात केली.
त्यानंतर त्यातुन गॅस निर्माती सुरु झाली. त्यावर स्वयंपाक करणे, पाणी तापवणे इत्यादी कामे होऊ लागली. त्यामुळे स्वयंपाकासाठी लागणारे सरपण वापरणे बंद झाले. धुरापासून मुक्तता झाली, अन्न शिजवणे लागणाऱ्या वेळेत बचत झाली. तसेच अन्न शिजवतांना आता भांडीही काळे होत नाही. बायोगॅस हे एक स्वस्त व प्रदूषणविरहीत इंधन आहे. बायोगॅस मधुन पूर्णपणे कुजून निघणारी स्लरी ही एक उत्तम सेंद्रिय खत आहे. पिकांच्या वाढीसाठी लागणारी मुख्य अन्नद्रव्ये तसेच दुय्यम अन्नद्रव्ये या स्लरी आढळून येतात. ज्यामुळे उत्पादनात वाढ होऊन माझ्या आर्थिक फायदा झाला आहे. बायोगॅसमुळे इंधनाची बचत तर होतीच शिवाय आरोग्य चांगले राखण्यास मदत होत आहे.

## लाभार्थी अभिप्राय :-

राष्ट्रीय बायोगॅस योजना सन २०१९-२०२० अंतर्गत पंचायत समिती मधुन मी ०३ घ.मी.आकारचे बायोगॅस सयंत्राचे बांधकाम केले. योजनेंतर्गत अनुदान मिळाले आहे. माझे कुटुंबाचे दैनदिन खर्चात बचत होवून, मला सेंद्रीय शेतीसाठी हातभार लागत आहे. या साठी मला श्री विशाल रामेश्वर वैराळ विस्तार अधिकारी (कृषि) पंचायत समिती परंडा यांनी वेळोवेळी मार्गदर्शन करून माहिती दिली.